# १०. आप्पांचे पत्र


अरविंद जगताप

मुंबईत एक माणूस असा आहे जो दर आठवडयाला लोकांच्या घरी जातो. ओळख नसली तरी. आणि करतो काय तर फक्त लोकांच्या घरी बेसिनचा, बाथरूमचा नळ गळत तर नाही ना हे तपासतो. त्याच्या एकटयाच्या कामामुळे गेल्या काही वर्षात लाखो लिटर पाणी वाचलंय जे नळ खराब असल्यामुळे वाया जायचं. पाण्याचे वाया जाणारे थेंब वाचवणं हे दु:खी माणसाच्या डोळ्यांतलं पाणी पुसण्याएवढंच महत्त्वाचं काम आहे. एका मुलाने आपल्या वाढदिवसाचे पैसे वाचवून ठेवले आणि काय केलं माहितेय? झोपडपट्टीमधल्या मुलांना नाल्यावरून एका तुटक्या लाकडी पुलावरून जावं लागायचं. त्याने आपल्या वाढदिवसाच्या पैशांतून त्या मुलांसाठी पक्का पूल बनवण्यासाठी आपले पैसे दिले.

असं आपल्याभोवती करण्यासारखं खूप आहे. एका माणसाने दहा झाडं जरी लावली तरी या देशाचं चित्र बदलून जाईल. जगातला सगळ्यांत जास्त निसर्गसंपन्न देश होईल भारत, कारण आपल्या देशाची लोकसंख्या सव्वाशे कोटीपेक्षा जास्त आहे. गुणिले दहा झाडं. विचार करा. अडचण अशी आहे, की आपल्याला आता कार्टून्सची नावं जास्त पाठ आहेत; पण झाडांची नावं विचारली तर दहा झाडंसुद्धा माहीत नसतात. तेच पक्ष्यांच्या बाबतीत कावळा, कबुतर, चिमणी आणि गरुड अशी काही नावं सोडली, तर आसपासचे पक्षीसुद्धा ओळखता येत नाहीत. फुलंसुद्धा पाच-सातच पाठ असतात.

(१) एका मुलाने आपल्या वाढदिवसाच्या पैशातून झोपडपट्टीतल्या मुलांसाठी पक्का पूल बांधायला आपले पैसे दिले, कारण -----------

(२) आकृती पूर्ण करा.



(३) पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखून लिहा.

पक्ष्यांच्या बाबतीत कावळा, कबुतर, चिमणी आणि गरुड अशी काही नावं सोडली, तर आसपासचे पक्षीसुद्धा ओळखता येत नाहीत. फुलंसुद्धा पाच-सातच पाठ असतात.

(४) पुढील सामासिक व समासाच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| १) इतरेतर द्वंद्व | अ) दोनचार |
| २) वैकल्पिक द्वंद्व | ब) आईवडील |
| ३) समाहार द्वंद्व | क) त्रिकोण |
| ४) द्विगू | ड) खाणेपिणे |

(५) पुढील अभ्यस्त शब्द पूर्ण करा.

१) अधून ------------------------------

२) दंगा ------------------------------

३) हेवे -----------------------------

(६) पुढील शब्दातील अक्षरांपासून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा.

१) वाढदिवस ------------, -----------------, ------------------, ---------------

२) समुद्रकिनारी --------------, --------------, -----------------, ---------------

(७) वाक्प्रचार : वाक्यात उपयोग करा.

१) वाया जाणे – फुकट जाणे.

२) डोळ्यातले पाणी पुसणे – अश्रू पुसणे.

(४) **स्वमत -** ‘पाण्याचे वाया जाणारे थेंब वाचवणं हे दु:खी माणसाच्या डोळ्यातलं पाणी पुसल्या एवढं महत्त्वाचं काम आहे’ आप्पांच्या या विधानामागील अर्थ स्वतःच्या शब्दांत लिहा.

परिच्छेद -२

पुस्तकातल्या पानांत डोक्याचं खाद्य असतं. झाडाच्या पानांत झाड जगवण्याचं बळ असतं. दोन्ही पानं महत्त्वाची असतात. दोन्हीपण बघितली पाहिजेत प्रेमाने. माणसं कितीही मोठी झाली, तरी त्यांची सावली कुणाला कामी येत नाही; पण झाडं मोठी झाली, तर कित्येक पिढयांना त्यांची सावली उपयोगी असते. तुमच्या घरापुढे कोणती गाडी आहे याच्यापेक्षा तुमच्या घराभोवती किती झाडी आहे, हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्ही किती श्रीमंत आहात हे दाखवायचं असेल, तर गाडी आवश्यक आहे; पण तुमचा देश किती श्रीमंत आहे हे दाखवायचं असेल, तर झाडी खूप आवश्यक आहे. झाडांचं वेड असणारी लाखो मुलं गरजेची आहेत.

खूप पैसे कमवायचे आणि निसर्ग बघायचा दुसऱ्या देशात जायचं स्वप्न असतं लोकांचं; पण आपल्या देशातला निसर्ग समृद्ध करणारी माणसं हवीत. तुमच्यापैकी खूप जण परदेशात जाणार आहात. तुमच्यापैकी एकजण तरी सवाई गंधर्व महोत्सवात गाताना दिसलं पाहिजे. परीक्षेत पहिले आलात तर शाळेच्या भिंतीवर तुमचं नाव असेल; पण तुमच्यापैकी एकाने तरी लिहिलेलं पुस्तक आपल्या शाळेच्या ग्रंथालयात दिसलं पाहिजे. तुम्ही जगातल्या मोठमोठया हॉटेलमध्ये जाणार आहात; पण तुमच्यापैकी एकाच्या तरी शेतात हुरडा खायला यायचंय मला. आपल्या पूर्वजांनी वेरूळ अजिंठा बनवलाय. जगभरचे लोक बघायला येतात. तुम्ही असंच नवीन काहीतरी भव्यदिव्य बनवून दाखवाल याची मला खात्री आहे.

(१) खालील शब्दसमूहांचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.

(i) पुस्तकाच्या पानांत डोक्याचं खादय असत. -

(ii) एकाने तरी लिहिलेलं पुस्तक आपल्या शाळेच्या ग्रंथालयात दिसलं पाहिजे. –

(२) तक्ता पूर्ण करा.

(i) सामान्य व्यक्तीची श्रीमंती - देशाची श्रीमंती.

| सामान्य व्यक्तीची श्रीमंती | देशाची श्रीमंती |
|---|---|
| | |

(ii) लेखकांना अपेक्षित असलेले छंद/व्यवसाय

अ) [ ] ब) [ ]

(३) विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) चांगले * --------------------

२) जास्त * --------------------

३) आवश्यक * ----------------

४) गुण * ------------------

५) राग * -------------------

(४) पुढील शब्दांना ‘त्व’ प्रत्यय लावून शब्द तयार करा.

१) महत् - ----------------------

२) कर्तु - -----------------------

३) प्रौढ - -----------------------


४) वक्र - ----------------------

(४) **स्वमत** - लेखकांनी उताऱ्यात व्यक्त केलेला पर्यावरणविषयक विचार तुमच्या शब्दांत व्यक्त करा.


## संपूर्ण पाठावर आधारित प्रश्न

### १) आकृती पूर्ण करा.

१)




२)



३) वृक्षसंवर्धनाचे फायदे

↓ ↓ ↓ ↓

४) आप्पांनी उल्लेखिलेले दोन कलावंत

↓ ↓

① ②

**२) कोण ते लिहा.**

१) वाळूत शिल्प बनवणारे –

२) जगप्रसिद्ध सनईवादक –

३) कष्टाची किंमत व गंमत दाखवणारे –

**३) आप्पांनी विद्यार्थ्यांच्या मोठेपणाची बघितलेली स्वप्ने –**

**५) कारणे लिहा.**

१) एका मुलाने आपल्या वाढदिवसाचे पैसे पक्का पूल बनवण्यासाठी दिले, कारण ...

२) आप्पा, शिक्षक शिकवितात ते खिडकीतून ऐकत असतात, कारण ...

३) आप्पा विद्यार्थ्यांना सांगतात, उगीच चिंता करु नका, कारण ...

४) खेळाडूंना खेळपट्टीची काळजी घेण्याऱ्याचं महत्त्व जास्त असत, कारण ...

५) पुस्तकांची पाने व झाडांची पाने दोन्ही महत्त्वाची असतात, कारण ...

**६) आप्पांचे परीक्षेतील गुणांबाबतचे मत: ...**

**७) झाडांचं वेड असणारी लाखो मुलं गरजेची आहेत– या विधानाचे स्पष्टीकरण करा.**